# निशाणी क्र.८० खालील आदेश

प्रतिवादी क्र.२ यांनी दावा डिसमिस करणेबाबत विनंती अर्ज केला आहे.

०२. प्रतिवादी क्र.२ यांचे असे कथन आहे की, वादी यांनी दावा मिळकतीचे वर्णन केलेले आहे त्यात दावा मिळकत अ.क्र.१० ला गट क्र.४५५ नमूद केला आहे व निशाणी क्र.१४ ला गट क्र.४५५ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर ७/१२ उताऱ्यावर गोदाबाई सदाशिव देवकर यांचे हिश्श्यास फेरफार क्र.१९७८ ने समाईक हिस्सा दिसत आहे. तरी गोदाबाई देवकर यांना याकामी पक्षकार केलेले नाही. तरी सदरचा दावा डिसमिस करणेस पात्र करणेस पात्र असून तसा आदेश होणेची विनंती केली आहे.

०३. वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र.८० अन्वये सादर केले. वादीने प्रस्तूतचे अर्जाला आक्षेप घेऊन असे कथन केले की, प्रतिवादीने केवळ दाव्याचे काम लांबावे म्हणून सदरचा अर्ज केला आहे. मुळात गट क्र.४५५ ही मिळकत विहीरपड असलेने त्याचे वाटप होत नाही, तर केवळ विहीरीत व विहीर पाण्यात हिस्सा ठरत असतो. सदर गटामध्ये मालकाचे नांव सदरी गोदाबाई सदाशिव देवकर व सुरेश सदाशिव देवकर यांची नांवे दाखल आहेत. सुरेश यांची गोदाबाई ही आई आहे. त्यामुळे, गोदाबाई करिता प्रतिनिधी म्हणून प्रतिवादी क्र.१४ सुरेश सदाशिव यांचे नांव नमूद आहे. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले की, वाटपाच्या दाव्यात ज्यांचे हिस्से बाधीत होतात त्यांना पक्षकार केले तरी चालू शकतात ते नेसेसरी पार्टीज असतात. सहहिस्सेदारांना पक्षकार केले नाही तरी दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येत नाही. प्रतिवादी म्हणत असलेले अ.क्र.१० ची मिळकत विहीरपड असलेने गोदाबाई सदाशिव देवकर यांना पक्षकार करणेची गरज नाही. सबब प्रतिवादी यांचा सदर अर्ज खर्चासह

नामंजूर होणेची विनंती वादी यांनी केली आहे.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी क्र.२ यांचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतींचे सरस-निरस मानाने वाटप होऊन वादी यांचा निम्मा हिस्सा वाटून मिळणेबाबत केलेला आहे. वादी यांनी निशाणी क्र.१४ वर गट क्र.४५५ चा ७/१२ उतारा दाखल केला आहे. सदर गट विहीरपड असून त्यामध्ये सदाशिव विठोबा देवकर यांचा पाच आणे चार पैचा हिस्सा नमूद केला आहे. माझे पूर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.४३ वर दि.२३.११.२०२१ रोजी मुद्दे काढले असून त्यामध्ये मुद्दा क्र.२ हा सदर दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येते काय, याबाबतचा आहे. सदरचा मुद्दा हा दोन्ही पक्षांचा पुरावा येऊन गुणदोषावर सिध्द होणार आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२ यांचा प्रस्तूत अर्ज याक्षणी मंजूर करणे न्यायोचित होणार नाही. तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ प्रमाणे प्रतिवादी क्र.२ ने निशाणी क्र.८० सोबत प्रतिज्ञापत्र दाखल केले नाही. सबब, सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे;

## आदेश

प्रतिवादी क्र.२ यांचा निशाणी क्र.८० वरील अर्ज नामंजूर करण्यात येतो.

MOHAMMAD SHARIQUEUR RAHEMAN ATAUR RAHMAN

Digitally signed by MOHAMMAD SHARIQUEUR RAHEMAN ATAUR RAHMAN
Date: 2024.03.11 18:01:04 +0530

विटा. (मो.शारीक ए.यू. रहेमान)
दि.११.०३.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- | M.S.A.U. Rahman,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 11.03.2024 |
| Order signed by P.O. on | :- | 11.03.2024 |
| Order uploaded on | :- | 11.03.2024. |